क्रमांक: आस्था/5904/२०२२
धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई
यांचे कार्यालय, दुसरा मजला, साऊथ विंग,
सासमिरा ईमारत, सासमिरा मार्ग, वरळी,
मुंबई-४०००३०
दि. ११/११/२२

विषय: कार्यालयीन अभिलेखाच्या प्रमाणित प्रती माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत न देता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ कलम २३ अन्वये देणेबाबत.

संदर्भ:

1. मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे अपील क्र.४७/२०२० मधील दि.०८.०३.२०२२ रोजीचे आदेश.
2. मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांचे अपील क्र.MHSICMU/२०२०/M/०००१७४ मधील दि.१९.०१.२०२१ रोजीचे आदेश.
3. मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांचे अपील क्र.MHSICMU/२०२०/M/०००१३० मधील दि.१२.०८.२०२१ रोजीचे आदेश.
4. मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांचे अपील क्र.MHSICMU/२०१९/M/००४५५० मधील दि.१६.०७.२०२१ रोजीचे आदेश.
5. मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांचे अपील क्र.MHSICMU/२०१९/M/०००६४३ मधील दि.०२.०५.२०१९ रोजीचे आदेश.
6. या कार्यालयाचे कार्यालयीन परिपत्रक क्र.५४४ दि. ०६.०७.२०१८.

## परिपत्रक क्रमांक 598 दिनांक ११/११/2022

धर्मादाय संघटनेच्या या व अधिनस्त कार्यालयात अभिलेखाच्या प्रमाणित प्रती मिळवण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत अर्ज या व अधिनस्त कार्यालयात प्राप्त होत असतात. या कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ कलम २३ अन्वये प्रमाणित प्रती देण्याची वैधानिक प्रक्रीया उपलब्ध असल्याने माहिती अधिकार अर्जदारास कार्यालयीन अभिलेखाची प्रमाणित प्रत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ कलम २३ अन्वये प्राप्त करुन घ्यावी, असे माहिती अधिकारी यांचेकडून कळविण्यात येते. यावर अर्जदार प्रथम तसेच व्दितीय अपीलात जातात.

त्याप्रमाणे प्रथम तसेच व्दितीय अपीलात देखील सदरील कार्यालयीन अभिलेखाच्या प्रमाणित प्रती महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ कलम २३ अन्वये अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी, असे आदेश संदर्भ क्र. १ ते ५ अन्वये याआगोदर निर्गमित झाले आहे.

सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त व इतर संबंधितांना विविध कार्यालयात तसेच या कार्यालयात न्यायिक प्रकरणात विविध कागदपत्रे सादर करावी लागतात. काही विश्वस्त/वकील/इतर संबंधित व्यक्ती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज सादर करुन या कार्यालयाचा व स्वत:चा वेळ व पैसा वाया घालवतात.

या कार्यालयाचे संदर्भ क्र. ६ च्या परिपत्रकान्वये प्रमाणित प्रती अर्ज आवक झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत (तात्काळ आवश्यक असल्यास ४८ तासांच्या आत) सुट्टीचे दिवस वगळून, उपलब्ध कागदपत्रांची नक्कल प्रती, अर्जदास अथवा अर्जदाराने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस 'अगाऊ शुल्क भरुन देण्यात यावी, असे निर्देशीत केलेले आहे.

वरील सर्व बाबींचे अवलोकन केले असता, वरील संदर्भ १ ते ५ च्या अनुषंगाने धर्मादाय संघटनेच्या कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ कलम २३ अन्वये प्रमाणित प्रती देण्याची वैधानिक प्रक्रीया उपलब्ध असल्याने, सार्वजनिक न्यासांच्या विश्वस्तांना/वकीलांना/व इतर संबंधीतांना कार्यालयीन अभिलेखांच्या प्रती माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत न देता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था नियम १९५१ कलम २३ अन्वये देण्यात याव्या.

सदरील परिपत्रक धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सर्व कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर डकवावे.

(महेंद्र के. महाजन)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:-

१. कार्यालयीन परिपत्रक धारीणी.
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त.
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त.
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त.
५. सर्व सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालये.
६.संगणक शाखा, मुख्यालय. (धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरीता.)